-: प्रेसनोट दिनांक- ३०/१२/२०२१ :-

**पांडुरंग लक्ष्मण गुरव, पोना/१३५५, नेम. शहापूर पोलीस ठाणे, इचलकरंजी रा. हळदकर बंगला, गोंजारी हॉस्पीटलशेजारी, खानापूर, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर, मुळ रा. मु.पो. पिरळ, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर यांनी लाचेची मागणी करून लाच स्विकारलेबाबत.........**

---

यातील तक्रारदार व त्याचे आईचे विरूध्द शहापूर पोलीस ठाणे, इचलकरंजी येथे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयाचा तपास शहापूर पोलीस ठाणेचे पोलीस गुरव हे करत आहेत. सदर गुन्हयाचे तपासात मदत करणेसाठी ५०००/- रू. लाचेची मागणी केली होती. त्यावेळी तक्रारदार यांनी नाईलाजास्तव त्यांचेकडील १०००/- रू. पोलीस गुरव यांना दिले होते. त्यानंतरही पोलीस गुरव यांनी तक्रारदार व त्याचे आईला गुन्हयामध्ये अटक न करता तक्रारदार व त्याचे आईला अटक न करता, चार्जशीटसह मा. कोर्टात हजर करून मदत करणेसाठी ४०००/- रू. लाचेची मागणी केलेने तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर विभागाकडे तक्रार केली होती.

तक्रारीप्रमाणे पडताळणी केली असता, दिनांक २८/१२/२०२१ रोजी शहापूर पोलीस ठाणे येथे पोना/१३५५ पांडुरंग गुरव यांनी शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडे त्याचे व त्याचे आई विरूध्द दाखल गुन्हयामध्ये त्यांना अटक न करता, चार्जशीटसह मा. कोर्टात हजर करून मदत करणेसाठी तक्रारदार यांचेकडुन यापुर्वी १०००/- रू. लाच स्विकारलयाचे मान्य करून त्यांचेकडे ४०००/- रूपये लाचेची मागणी केली.

आज दि. ३०/१२/२०२१ रोजी शहापूर ते कोरोची जाणारे रोडवर सापळा कारवाई आयोजित केली असता, आरोपी लोकसेवक पोना/१३५५ पांडुरंग गुरव यांनी मागणी केलेली लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडणेत आले आहे. सदरबाबत आरोपी लोकसेवक पांडुरंग लक्ष्मण गुरव, पोना/१३५५, नेम. शहापूर पोलीस ठाणे, इचलकरंजी रा. हळदकर बंगला, गोंजारी हॉस्पीटलशेजारी, खानापूर, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर, मुळ रा. मु.पो. पिरळ, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरू आहे.

**सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा. श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा. श्री. सुहास नाडगोडा, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व मा. श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांचे मार्गदर्शनानुसार श्री. सतीश मोरे, पोलीस निरीक्षक, सफौ. संजीव बंबरगेकर, पोहेकॉ अजय चव्हाण, पोना विकास माने, सुनिल घोसाळकर, नवनाथ कदम व पोकॉ मयुर देसाई, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.**

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी क्रमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३,

४) कार्यालय दुरध्वनी क्रमांक - ०२३१/२५४०९८९.

५)हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक:- १०६४, ५) व्हॉटस अप क्रमांक :- ७८७५३३३३३३.

Scanned by TapScanner